संपादक : यजुर्वेंद्र महाजन
-: कार्यकारी संपादक :-
जगदीश पाटील, स्वामी पाटील

दीपस्तंभ
शिक्षण क्रांती

मासिक : डिसेंबर २०१५ व जानेवारी २०१६    अंक : सातवा


## दीपस्तंभचे मनोबल व गुरुकुल प्रकल्प

# नॅशनल कॉन्फरन्स फॉर सोशल इनोव्हेशन मध्ये सादर..



भारतात अभिनव सामाजिक उपक्रमांची परंपरा असून भविष्यात त्यामध्ये वाढ व्हायला हवी मात्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची नितांत गरज आहे. देशातील शासकीय योजनांसोबतच सामाजिक संस्थांच्या अभिनव कार्यातूनच आपल्या देशाचा विकास होईल. असे प्रतिपादन भारताचे उपराष्ट्रपती मा.डॉ.हमीद अन्सारी यांनी पुणे येथील नॅशनल कॉन्फरन्स फॉर सोशल इनोव्हेशनच्या उद्घाटन प्रसंगी केले. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल विद्यासागर राव हे उपस्थित होते. राष्ट्रीय पातळीवरील सामाजिक क्षेत्रातील अत्यंत अभिनव सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांसाठी दरवर्षी पुणे इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर या संस्थेच्या वतीने नॅशनल कॉन्फरन्स फॉर सोशल इनोव्हेशनचे आयोजन केले जाते. १७ नोव्हेंबर रोजी पुणे येथे झालेल्या या कॉन्फरन्स मध्ये भारतातील अत्यंत अभिनव अशा २१ सामाजिक प्रकल्पांत दीपस्तंभ फाऊंडेशनच्या मनोबल या अंध व अपंग विद्यार्थ्यांसाठीच्या देशातील पहिल्या व गुरुकुल या अत्यंत गरीब, वंचित, अनाथ विद्यार्थ्यांसाठीच्या निवासी स्पर्धा परीक्षा केंद्र या प्रकल्पांची निवड करण्यात आली होती. या कॉन्फरन्समध्ये डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ.विजय केळकर यांच्यासह टाटा मोटर्स यांसारख्या ७० नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधीही यावेळी उपस्थित होते. यात दीपस्तंभच्या मनोबल व गुरुकुल या प्रकल्पांचे सादरीकरण कार्यकारी संचालक प्रा.यजुर्वेंद्र महाजन यांनी



पुणे येथील नॅशनल कॉन्फरन्स फॉर सोशल इनोव्हेशनमध्ये दीपस्तंभच्या मनोबल व गुरुकुल या प्रकल्पांबाबत माहिती जाणून घेतांना भारताचे महामहीम उपराष्ट्रपती मा. डॉ. हमीद अन्सारी समवेत डॉ.रघुनाथ माशेलकर, व माहिती देतांना प्रा.यजुर्वेंद्र महाजन.

## सहकार मंत्री चंद्रकांत पाटील यांची दीपस्तंभ 'मनोबल' केंद्रास भेट

अभावाचे रुपांतर प्रभावात करण्याच्या पद्धतीमुळे तुम्हाला निश्चित यश मिळेल असा मला विश्वास वाटतो. असे प्रतिपादन महाराष्ट्राचे सहकार, पणन, वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दीपस्तंभ फाऊंडेशनच्या ' मनोबल ' या अंध व अपंगांसाठीच्या निवासी स्पर्धा परीक्षा केंद्रास नुकत्याच दिलेल्या भेटीप्रसंगी केले . याप्रसंगी ना.चंद्रकांत पाटील यांनी प्रकल्पाबाबत माहिती जाणून घेतली व विद्यार्थ्यांशी प्रेरणादाई संवाद साधला. दीपस्तंभ करत असलेल्या या क्षेत्रातील कार्याबद्दल कौतुक केले.तसेच प्रज्ञाचक्षु (अंध) व विशेष (अपंग) विद्यार्थ्यांना स्पर्धा



परीक्षा तयारीसाठी शुभेच्छाही त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी भरत अमळकर, दिलीप रामू पाटील, यजुर्वेंद्र महाजन, लक्ष्मण सपकाळे, राजेंद्र चव्हाण उपस्थित होते. यावेळी मनोबल मधील विद्यार्थ्यांनी ना.चंद्रकांत पाटील यांचा मानपत्र देऊन सत्कार केला. सर्व विद्यार्थ्यांना भेटण्यास आलेले मंत्री महोदय यांनी नववर्षाच्या पूर्वसंध्येला शुभेच्छा दिल्याने अंध व अपंग विद्यार्थ्यांनी यावेळी समाधान व्यक्त केले.

## दीपोत्सव साजरा

दीपस्तंभ या मनोबल अंध अपंग विद्यार्थ्यांच्या निवासी स्पर्धा परीक्षा केंद्रात दिवाळी निमित्त अत्यंत अभिनव असा प्रकाश पूजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यात या प्रज्ञाचक्षु विद्यार्थ्यांच्या आत असणाऱ्या प्रकाशाने शिक्षकांनी पूजन केले. धन्या अग्नि दिव्यांनी तेजाची आरती केली. विद्यार्थ्यांनी विविध कला सादर करत उत्साहाच्या वातावरणात दीपोत्सव साजरा केला. कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हाधिकारी गुलाबराव खरात, जेष्ठ पत्रकार विश्वासराव पनाट, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राजेश पाटील, अनिश शहा, अॅड.राजेश झाल्टे, ज. जि. म. वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, माजी महापौर किशोर पाटील, हे मान्यवर अतिथी उपस्थित होते.





एंजल प्रो नावाचे ऑडीओ रेकॉर्डिंग यंत्र विद्यार्थ्यांना वितरीत करतांना मान्यवर.

# जागतिक अपंग दिन साजरा

आज मलाच या मनोबल केंद्रात येऊन तुमच्याकडे बघून खूप प्रेरणा मिळाली.या समाजाने अन्ध व अपंग व्यक्तींकडे दयेच्या नजरेने न बघता त्यांच्या आंतरिक सामर्थ्याचे कौतुक करत प्रोत्साहन द्यायला हवे . असे प्रतिपादन आमदार स्मिताताई वाघ यांनी दीपस्तंभ मनोबल ' या अंध व अपंगांसाठीच्या निवासी स्पर्धा परीक्षा केंद्रात आयोजित जागतिक अपंग दिन कार्यक्रमात केले . यावेळी आरोग्य अधिकारी डॉ.श्यामसुंदर निकुंभ, मुकुंद गोसावी, कांचननाथ इंगळे, देशदूतचे मनीष पाटीलवार, रोटरीचे संजय वाणी, यजुर्वेंद्र महाजन हे मान्यवर यावेळी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते यावेळी या प्रज्ञाचक्षु (अंध) विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असे एंजल प्रो नावाचे ऑडीओ
रेकॉर्डिंग यंत्र विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आले. प्रज्ञाचक्षु (अंध) व विशेष (अपंग) विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.
रोटरी क्लब जळगाव च्या वतीने दिपस्तंभ मनोबल केंद्रातील अंध व अपंग विद्यार्थ्यांसाठी यावेळी अपंग दिनानिमित्त पाणी शुद्धीकरण यंत्रणा पाण्याच्या टाक्या व फिटिंग स्वरुपात भेट म्हणून देण्यात आली.
मैत्री सहयोग गटाची स्थापना - जागतिक अपंग दिनी अंतर्गत विद्यार्थ्यांच्या मैत्री सहयोग गटाची स्थापना करण्यात आली . दीपस्तंभ मधील प्रज्ञाचक्षु ( अंध ) विद्यार्थ्यांसोबत इतर विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचन,चर्चा करणे,ऑडीओ स्वरुपात पुस्तकांच्या नोट्स तयार करणे,पाठ- पठणासाठी उपलब्ध करून देणे.असे उपक्रम राबविले जाणार आहेत. यामुळे प्रज्ञाचक्षु विद्यार्थ्यांना जलद गतीने अभ्यास करण्यास विशेष सहकार्य होईल.

# दीपस्तंभतर्फे दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर पाल्य यांना अनोखी दिवाळी भेट

**कर्मवीर भाऊराव पाटील शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत २ लाख २८ हजार रुपयांचे सहाय्य**

महाराष्ट्रातील २४ विविध जिल्ह्यांतून आलेल्या अल्पभूधारक ,दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी २ लाख २८ लाख रुपयांची मदतीच्या स्वरूपाने अनोखी दिवाळी भेट देण्यात आली. दीपस्तंभ परिवारातील सर्व सहकाऱ्यांनी एकत्रितपणे गोळा केलेली ही रक्कम विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क, स्पर्धा परीक्षांची पुस्तके, ग्रंथालय, निवास व भोजन व्यवस्था सुविधा अशा स्वरुपात मदत यावेळी देण्यात आली.विशेष म्हणजे राजेंद्र पाटील आणि जयदीप पाटील यांनी प्रत्येकी दोन गरीब व होतकरू विद्यार्थी मुला-मुलींना दिवाळी निमित्त कपड्यांच्या स्वरुपात भेट दिली आहे. २०१५-१६ मध्ये दीपस्तंभ फाउंडेशन जळगाव येथे महाराष्ट्रातील दुष्काळाशी सामना करणाऱ्या आणि आत्महत्या केलेल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांतील १३२ मुलामुलींना विनामूल्य प्रशिक्षण दिले जात आहे. याचबरोबर ६२ अंध व अपंग विद्यार्थी कर्मवीर भाऊराव पाटील शिष्यवृत्ती व प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण निवास व भोजन व्यवस्थेचा लाभ घेत आहेत. अनेक संवेदनशील व्यक्ती त्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारत आहेत.यातच ही वाढीव मदत जाहीर करण्यात आली असल्याचे यजुर्वेंद्र महाजन यांनी सांगितले.



स्पर्धा परीक्षांची पुस्तके सुपूर्त करतांना दीपस्तंभचे राजेंद्र पाटील, समवेत जयदीप पाटील, पंकीत गायके.

# गरजूंना मदत करणे, हे अनोखे कार्य

**डॉ. प्रकाश आमटे : दीपस्तंभच्या वतीने डॉ. जगन्नाथ वाणी यांचा कृतज्ञता सोहळा**



गरजूंना किंवा विविध संस्थांना त्यांची गरज शोधून काढून त्यांना मदत करणे, हे अनोखे कार्य आहे, असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रकाश आमटे यांनी व्यक्त केले. कॅनडास्थित ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते 'ऑर्डर ऑफ कॅनडा' या पुरस्काराने सन्मानित डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या गौरव समारंभात ते बोलत होते. या वेळी डॉ. मंदा आमटे, माजी अप्पर मुख्य सचिव लीना मेहेंदळे, मानव संसाधनाचे नियुक्त विभाग प्रमुख सतीश प्रधान, स्नेहालय संस्थेचे डॉ. गिरीश कुलकर्णी, भगिनी निवेदिताच्या नीलिमा मिश्रा, कार्यक्रमाचे संयोजक व दीपस्तंभ संस्थेचे संस्थापक यजुर्वेंद्र महाजन, या या संस्थेचे अमृत बक्षी, विविध सामाजिक संस्थांचे सभासद कार्यकर्ते आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. दीपस्तंभ फाऊंडेशन (जळगाव) यांनी पुणे येथे नुकत्याच आयोजित केलेल्या कृतज्ञता सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्थांच्या वतीने डॉ. जगन्नाथ वाणी यांनी केलेल्या मदतीसाठी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या वेळी मंजिरी धामणकर यांनी डॉ. वाणी यांची मुलाखत घेतली. दीपस्तंभ या संस्थेने ग्रामीण आणि आदिवासी भागात केलेल्या कार्याचा दहा वर्षांच्या वाटचालीवरील माहितीपटही यावेळी दाखविण्यात आला. कृतज्ञता व्यक्त करताना प्रकाश आमटे म्हणाले, बऱ्याचदा कृतज्ञता व्यक्त करणे आपण विसरून जातो. आदिवासी एकमेकांना मदत करतात आणि विसरून जातात. मात्र, डॉ. वाणी अशी व्यक्ती आहे की आपणहून एखाद्या संस्थेत जाऊन त्यांची गरज शोधून काढून त्यांना मदत करत असतात. गडचिरोली मधील हेमलकसा या प्रकल्पाला स्वतःहून भेट देऊन त्यांनी मदतीसाठी हात पुढे केला आणि तब्बल ६५ लाख रुपयांची मदत केली. लीनाताई मेहेंदळे म्हणाल्या की , "दीपस्तंभ फाऊंडेशनच्या शिक्षणातील गुणवत्तावाढीसाठी व स्पर्धा परीक्षांचे दिले जाणारे प्रशिक्षण यास आता चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.याची व्याप्ती देशभरात पोहोचवायला हवी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली." डॉ. वाणी अनेक वर्ष कॅनडा देशात राहून त्या ठिकाणच्या लोकांच्या मदतीने करोडो रुपयांचा फंड गोळा करून देशात हजारो सामाजिक संस्थांना आर्थिक मदत केली आहे.

## दीपस्तंभ आत्मविश्वास व प्रेरणा वाचन अभियान



# शिक्षकच देश घडवतील : आ. स्मिताताई वाघ

तुमच्यासारखे शिक्षकच हा देश घडवतील चांगले शिक्षकच हा देश घडवतील शिक्षक अधिक समृद्ध होण्यासाठी अशा उपक्रमांची अत्यंत आवश्यकता आहे. असे प्रतिपादन कृषक भवनात जळगाव केंद्रावर परीक्षेसाठी आलेल्या शिक्षकांना शुभेच्छा देतांना स्थानापर कार्यक्रमात आमदार स्मिता ताई वाघ यांनी केले.तर दरवर्षी हजारो चांगल्या शिक्षकांचा या अभिनव उपक्रमास प्रतिसाद मिळतो.शिक्षण क्षेत्रातील हे एक सकारात्मक उदाहरण आहे. अनेक शिक्षक खूप चांगले आहेत परंतु त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक व्यासपीठ निर्माण व्हावे,वाचन,लेखन,अभ्यास सहल,प्रशिक्षण देण्याची संधी त्यांना मिळावी यासाठी हा उपक्रम राबविला जातो.असे अध्यक्षीय मार्गदर्शनातून दीपस्तंभचे ज्येष्ठ मार्गदर्शक नीलकंठराव गायकवाड यांनी केले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी विजय पवार,मुख्याध्यापक संघाचे श्री.चंद्रकांत सर,दीपस्तंभचे कार्यकारी संचालक यजुर्वेंद्र महाजन व वाचन अभियान प्रमुख अनिल भोळे हे उपस्थित होते. प्रा.धर्मेंद्र चव्हाण यांनी आभार मानले.



परीक्षेसाठी शुभेच्छा देतांना आमदार स्मिता वाघ व मान्यवर .



# विद्यार्थी, शिक्षकांनी उत्स्फुर्तपणे दिली परीक्षा

### खान्देशसह नांदेड,मनमाड,दौंड, यवतमाळ येथे २२५ केंद्रांवर परीक्षा

दीपस्तंभ आत्मविश्वास व प्रेरणा वाचन अभियानाअंतर्गत या वर्षी सुद्धा खान्देशातील २५ तालुके यांसह नांदेड, मनमाड, दौंड, यवतमाळ येथे २०० केंद्रांवर झालेल्या या परीक्षेत १३हजार ५१८ विद्यार्थी व १ हजार ७५३ शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत परीक्षा दिली.दोन पुस्तकांचे वाचन करून त्यातील उतार्‍यांवर आधारीत वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाची लेखी परीक्षा घेण्यात आली. परीक्षेचा निकाल ०७ जानेवारी २०१६ ला संबंधीत शाळांना कळविण्यात येणार आहे. या परीक्षेच्या माध्यमातून,निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दिल्ली,पुणे येथे शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन बक्षिस म्हणून केले जाईल. तसेच व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा व शालेय साहित्य भेट म्हणून दिले जाईल. रतनलाल सी बाफना ट्रस्ट जळगाव आणि देशबंधू अँड मंजू गुप्ता फाऊंडेशन यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला जात आहे. चांगली प्रेरणादायी पुस्तके आम्हाला या अभियानामुळे मिळाली त्यामुळे वाचनाची गोडी लागली.तसेच परीक्षेतूनही खूप काही शिकायला मिळाले.विशेषतः सलाम मृत्युंजयांना या पुस्तकातून आपल्या देशाच्या सुरक्षेसाठी सैनिक करीत असलेली मेहनत व त्याग याची जाणीव झाली.खरच त्यांना सलाम करावासा वाटतो. अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली तर या अभियानामुळे अत्यंत प्रेरणादायी व माहितीपर पुस्तके वाचण्याची संधी आम्हाला मिळाली. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसाठी अधिकाधिक कष्ट करण्याची प्रेरणा मिळाली. परीक्षेची सुरुवातीला भीती होती.परंतु परीक्षेचे स्वरूप हे तणावमुक्त व अधिकाधिक शिकण्यास प्रवृत्त करणारे होते. आम्हाला आत्मविश्वास जागृत झाला. अशी प्रतिक्रिया शिक्षकांनी व्यक्त केली.

# स्नेहालयतर्फे ही नेम्ड मी मलाला माहितीपटातून विद्यार्थ्यांनी घेतली सामुहिक प्रेरणा

स्नेहालय अहमदनगर या संस्थेच्या सहकार्याने, १७ व्या वर्षी नोबेल पारितोषिक मिळवणारी मलाला युसुफझाईच्या जीवन प्रवास सांगणारा डेव्हिस गुगेनहेम दिग्दर्शित ही नेम्ड मी मलाला हा प्रेरणादाई माहितीपट दीपस्तंभ फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांना खान्देश सेन्ट्रल मॉलमधील आयनॉक्स मल्टीप्लेक्स सिनेमागृहात नुकताच दाखविण्यात आला.२५० विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होत यातून सामुहिक प्रेरणा घेतली.



दीपस्तंभ फाउंडेशनच्या स्पर्धा परीक्षा व मनोबल केंद्रातील विद्यार्थ्यांना स्नेहालय अहमदनगर या संस्थेच्या सहकार्याने नेम्ड मी मलाला हा माहितीपट दाखविण्यात आला.

## दृष्टीकोनात व जीवनात बदल करा : प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर

भारतीय संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यात औरंगाबाद विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर प्रमुख वक्ता मार्गदर्शन करतांना म्हणाले की, भारतीय संविधानाचा आदर ठेवण्यासाठी राजकीय लोकशाहीच सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीत रुपांतर करणे गरजेचे आहे. यासाठी आम्हाला आपल्या दृष्टीकोनात व जीवनशैलीत बदल केला पाहिजे. अशक्य ही शक्य जो करून दाखवितो त्या प्रतिभाशाली असतो. यापेक्षा जो अधिक काम करतो तो हिरा म्हणून गणला जातो. असेच काम अष्टपैलू असे व्यक्तिमत्व व कार्य असलेले भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आहे. यामुळेच या देशात स्वातंत्र्य, समता, बंधुता आज देशात टिकून आहे. बंदुकीच्या गोळीतून नव्हे मतपेटीतून जिथे क्रांती होते तिला लोकशाही म्हणतात. दुसऱ्या सत्रा विधी महाविद्यालयाचे प्रा.गणपत धुमाळे यांनी भारतीय संविधानाबाबत विद्यार्थ्यांना सखोल अशी माहिती दिली.



दीपस्तंभ फाउंडेशनच्या वतीने भारतीय संविधान दिनानिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमाप्रसंगी कृषक भवनात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना औरंगाबाद विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाचे प्रमुख जेष्ठ प्रा.डॉ.वि.ल.धारूरकर.

## दीपस्तंभतर्फे बँक परीक्षांसाठी विनामुल्य कार्यशाळा

भारतीय स्टेट बँक या वित्तीय वर्षात ७ हजार कर्मचाऱ्यांची भरती करणार आहे. यासाठी होणाऱ्या परीक्षेविषयक येथील दीपस्तंभ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे जिल्हा सत्र न्यायालय समोरील कृषक भवनात विनामुल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. स्टेट बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक रणजीत कुमार यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितल्या नुसार, या वर्षात ७०० नव्या शाखा सुरु होतील.यात २ हजार प्रोबेशनरी ऑफिसर्स व ५ हजार क्लर्कसची आवश्यकता आहे. याबाबतची माहिती, परीक्षा स्वरूप व तयारी संदर्भात दीपस्तंभचे प्रा.यजुर्वेंद्र महाजन, बँक विभाग प्रमुख प्रा.सोमचंद्र पाटील यांनी मार्गदर्शन केले.



राज्यसेवा पुर्व परीक्षेविषयक येथील दीपस्तंभ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात विनामुल्य कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना उपजिल्हाधिकारी विजयानंद शर्मा.

## ध्येय मोठे ठेवा यश हमखास : विजयानंद शर्मा

१० एप्रिलला होणाऱ्या राज्यसेवा पुर्व परीक्षेविषयक येथील दीपस्तंभ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे रविवारी दीपस्तंभ मुख्य कार्यालयाजवळ विनामुल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. परीक्षा स्वरूप व तयारी संदर्भात विजयानंद शर्मा (उपजिल्हाधिकारी) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, अपयशाने खचून न जाता स्पर्धा परीक्षेची तयारी करावी. जीवनात अपयशाने खचून न जाता कठोर परिश्रम, जिद्द आणि अभ्यासात सातत्य हे गुण आत्मसात करावेत. राज्यसेवेचा अभ्यास केला तर इतर स्पर्धा परीक्षा जसे पीएसआय, एसटीआय साठी अभ्यासाची तयारी होते. तर दीपस्तंभचे प्रा.हर्षल कुलकर्णी म्हणाले की, नियोजनबद्ध अभ्यास, जुन्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण, ठराविक महत्वाच्या मुद्द्यांवर विशेष लक्ष यांसह आवश्यक बाबी लक्षात घेतल्यास राज्यसेवा परीक्षा उत्तीर्ण होता येईल.

## दीपस्तंभ तर्फे साने गुरुजींची जयंती साजरी



दीपस्तंभ फाउंडेशनतर्फे साने गुरुजी जयंती निमित्त प.सु.छाजेड प्राथमिक शाळेतील शिक्षक सुनील पवार यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी साने गुरुजींच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून सुरुवात झाली. साने गुरुजींची मराठी साहित्यिक, स्वातंत्र्य सेनानी, संवेदनशील हळव्या मनाचे कवी म्हणून त्यांची ओळख आहे. गुरुजींनी विपुल साहित्य लिहिले. लहान मुलांवर संस्कार करणाऱ्या गोष्टी, साने गुरुजी कथामालेतर्फे महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत व घरात ते गोष्टीरूपाने सर्वदूर पोहोचले आहेत. समाजातील जातिभेद, अस्पृश्यता यांसारख्या अनिष्ट रूढी व परंपरांना साने गुरुजींनी नेहमी विरोध केला. असे श्री पवार यांनी मार्गदर्शनातून सांगितले.

## 'कर सहायक' पदी ११ विद्यार्थ्यांची निवड

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने विक्रीकर विभागातील कर सहायक गट क पदासाठी एप्रिल २०१४ मध्ये ५८८ जागांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यात दीपस्तंभ फाउंडेशनच्या ११ विद्यार्थ्यांनी दैदीप्यमान यश प्राप्त केले आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील मुलं व मुली नेहमीच्या बळावर विविध प्रशासकीय पदांवर रुजू होत आहेत. हे समाजातील बदलाचे सकारात्मक उदाहरण असून, विशेषतः यात मुलींचे प्रमाण लक्षणीय दिसून येत आहे. असे यजुर्वेंद्र महाजन यांनी सांगितले.



[illegible]



[illegible]

## पुस्तक प्रकाशन



पुणे येथील डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या जीवनप्रवासावर आधारीत 'सहासमुद्रापल्याड' या पुस्तकाचे प्रकाशन करतांना दीपस्तंभ प्रकाशनाचे त्यावेळी सुषमा शितोळे, रावसाहेब बढे, लीना मेहेंदळे, डॉ. जगन्नाथ वाणी, डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदा आमटे, यजुर्वेंद्र महाजन.



दीपस्तंभ व्याख्यानमाला २०१५ मध्ये कवी कमलाकर देसले व खलील मोमीन यांच्या काव्य कार्यक्रमावर केलेल्या बिंब प्रतिबिंब या पुस्तकाचे प्रकाशन करतांना निळकंठराव गायकवाड, हर्षल चौधरी, सोनाली नांगुल, बाळासाहेब सूर्यवंशी, खलील मोमीन, जगदीश महाजन, यजुर्वेंद्र महाजन, एकनाथ पवार, कमलाकर देसले, स्नेहल नवाफुलकर.



ग्रामिण भागात व्याख्यानातून मार्गदर्शन करतांना दीपस्तंभ चे कार्यकारी संचालक यजुर्वेंद्र महाजन

## जयदीप पाटील विज्ञान पुरस्काराने सन्मानीत



दीपस्तंभ चे स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख जयदीप पाटील यांना नोबेल पारितोषिक जागरुकता निर्माण करण्यासाठी सुरु केलेल्या कार्याबद्दल मराठी विज्ञान परिषद मुंबई ( जळगाव प्रभाग) तर्फे विज्ञान सेवक पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

सौरऊर्जा संशोधक अजय यावलकर यांच्या प्रमुख उपस्थिती व हस्ते हा पुरस्कार जयदीप पाटील यांना प्रदान करण्यात आला. आतापर्यंत विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये नोबेल विषयक जनजागृतीपर अनेक व्याख्याने श्री. पाटील यांनी दिले आहेत. या माध्यमातून त्यांनी युवकांमध्ये विज्ञान विषयक दृष्टीकोन तयार करण्यासाठी विशेष कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला आहे.

## खा. शरद पवारांकडून दीपस्तंभ प्रकल्पांचे कौतुक

पुणे येथील कृषी महाविद्यालयामध्ये भीमथडी जत्रा २०१५ बारामती आयोजीत या कार्यक्रमात दीपस्तंभ प्रकाशनाच्या पुस्तकांची व विविध प्रकल्पांची मा. खासदार शरद पवार यांनी माहिती जाणून घेतली. तसेच दीपस्तंभच्या कार्याबद्दल कौतुक केले.

दीपस्तंभच्या वतीने पुस्तक विक्री स्टॉलला या ठिकाणी पुणे करांनी उत्स्फूर्तपणे भेट देवून माहिती जाणून घेतली. दीपस्तंभचे सहकारी धनश्याम पाटील, पवन पाटील यांनी दीपस्तंभ बद्दल सविस्तर माहिती दिली.



दीपस्तंभच्या विविध प्रकल्पांची माहिती जाणून घेतांना मा. खासदार शरद पवार.

नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ लिडरशीप डेव्हलपमेंट

थोर समाजसेवक डॉ. बाबा आमटेंच्या जयंती निमित्त

## दीपस्तंभच्या विद्यार्थ्यांनी केली गरजुंना मदत





मुरलीधर देवीदास आमटे उर्फ डॉ. बाबा आमटे यांच्या जयंती निमित्त दीपस्तंभ फाऊंडेशनच्या नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ लीडरशिप डेव्हलपमेंटच्या विद्यार्थ्यांनी जळगाव मधील गरजू १५० प्रौढ व वृद्ध तसेच १०० लहान मुलांना शाल, स्वेटर व टोपी, शालेय साहित्य, फळं व बिस्कीट वाटप केले. मेहरुण तलाव, बस स्थानक, रेल्वे स्टेशन, टॉवर, शनी मंदिर परिसर, शिवाजी नगर परिसर, एमआयडीसी परिसर,गोलाणी मार्केट, फुले मार्केट या भागात प्रत्यक्षरित्या सर्वेक्षण करुन तेथे ही मदत दिली. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वतः गोळा करुन व हे सर्व साहित्य आपल्या गरजूंना वाटप केले. बाबा आमटेंच्या कार्याच्या स्मरणार्थ आम्ही आज हा उपक्रम राबविला असल्याच्या भावना यावेळी दीपस्तंभच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

## १२५ विद्यार्थ्यांचा इंटर्नशिपमध्ये उत्स्फुर्त सहभाग

नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ लिडरशीप डेव्हलपमेंटच्या १२५ विद्यार्थ्यांचा इंटर्नशिप कार्यक्रम दिनांक १७, १८, १९ डिसेंबर दरम्यान झाला. या अंतर्गत संपुर्ण देशात ६ राज्यांमध्ये विविध जिल्ह्यांमधील आयएएस, आयपीएस, आयआरएस तसेच महाराष्ट्रातील विविध पदांवर कार्यरत असणाऱ्या ६२ अधिकाऱ्यांकडे दोन ते तीन दिवसीय प्रशासकिय कामाचे अवलोकन व प्रशिक्षणासाठी २-२ च्या गटाने विद्यार्थी गेले होते.

या दरम्यान त्यांना त्या-त्या पदावरील अधिकाऱ्यांचे काम काय असते? हे समजून घेतले. विविध त्यांच्या बरोबर ऑफिसमध्ये व मिटींगमध्ये सहभागी होवून त्यांचे काम करण्याची पद्धती, निर्णय कसे घेतले जातात? त्यावर अंमलबजावणी कशी केली जाते? याबाबत उत्सुकतेने माहिती जाणून घेत प्रत्यक्षरित्या तेथील कामकाजाचा अनुभव घेतला.



## हेल्पर्स ऑफ दि हॅंडिकॅपच्या वतीने यजुर्वेंद्र महाजन अपंग मित्र पुरस्काराने सन्मानित



कोल्हापूर उपनाव-गडहिंग्लजी, येथील झालेल्या कार्यक्रमात पुरस्कार वितरणप्रसंगी डावीकडून अशोक सोनुले, भावेश भाटिया, अब्दुल रेहमान, साहेबपटेल मदरकर, शाहिनेनाम मदरकार, यजुर्वेंद्र महाजन, डॉ. जनार्दन वाणी,डॉ. विनय बऱ्हाळे, तसेच खालीबसलेल्या (डावीकडून) नसीमा हुरजूक, डॉ. महजबीन मदरकार.

अंध व अपंग तरुणांसाठी देशातील पहिले ' दीपस्तंभ मनोबल ' हे विनामूल्य निवासी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र सुरु करणारे जळगावच्या दीपस्तंभ फाऊंडेशनचे संस्थापक यजुर्वेंद्र महाजन यांना राष्ट्रीय स्तरावरील ' अपंग मित्र ' पुरस्काराने, कोल्हापूर येथील हेल्पर्स ऑफ दि हॅंडीकॅप संस्थेच्या वतीने नुकतेच सन्मानित करण्यात आले. उ च गा व -ग ड हि ं ग्ल जी , कोल्हापूर येथील झालेल्या या कार्यक्रमात महाराष्ट्र सेवा समिती कॅनडा चे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाणी अध्यक्षस्थानी होते.

महाबळेश्वर येथील अंध उद्योजक भावेश भाटिया, औरंगाबादचे विख्यात मानसोपचार तज्ञ डॉ. विनय बऱ्हाळे, अशोक सोनुले,अब्दुल रेहमान, साहेबपटेल मदरकार, शाहिनेनाम मदरकार, डॉ. महजबीन मदरकार,हेल्पर्स ऑफ दि हॅंडीकॅप संस्थेच्या अध्यक्षा नसीमा हुरजूक हे मान्यवर उपस्थित होते.यावेळी मुस्लिमांनाही लाजवेल असे कार्य केलेल्या मंगळोरच्या डॉ. महजबीन मदरकार यांना 'भरारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नसीमा हुरजुक म्हणाल्या की, अपंगांच्या कर्तृत्वाला पंख देण्याचे काम दीपस्तंभ फाऊंडेशनतर्फे केले जात आहे.

अपंगही उच्च अधिकारी व्हावेत, यासाठी दीपस्तंभ ' मनोबल ' केंद्राच्या माध्यमातून लोकसहभागातून प्रयत्न करत आहेत. त्यांना नक्कीच यश येईल. पुरस्कार स्विकारताना यजुर्वेंद्र महाजन म्हणाले की, हा पुरस्कार मनोबल केंद्रातील सर्व अंध व अपंग विद्यार्थी आणि दीपस्तंभच्या कार्यकर्त्यांना मी अर्पण करीत आहे. हे विद्यार्थी अधिकारी होतील व लाखो व्यक्तींना प्रेरणा देतील. देशातील करोडो अंध व अपंग युवकांच्या पुनर्वसनाचे नियोजन करण्याची आवश्यकता आहे. या पुरस्कारातून मिळालेली रक्कम मनोबल केंद्रासाठी मी देत आहे.



ग्रामिण भागात व्याख्यानातून मार्गदर्शन करतांना दीपस्तंभ चे कार्यकारी संचालक यजुर्वेंद्र महाजन

## सन्मानीय देणगीदार

| | |
|---|---|
| मा. श्रीमती योगीता इंद्रजीत कार्ले | 5000 |
| मा. श्रीमती माधुरी किशोर पाटील | 5001 |
| मा. श्री. अनिल कृष्णनाथ दिवाळकर | 100000 |
| मा. श्री. सुहास एकनाथ वाघरे | 8000 |
| मा श्रीमती. सायली सुहास वाघरे | 8000 |
| मा. श्रीमती. निर्मला श्रीपाद डबके | 25000 |
| मा. श्री. श्रीपाद दामोदर डबके | 25000 |
| मा. श्रीमती कल्पना शेखर भोळे | 11000 |
| मा. श्री. रमेश रामचंद्र भोसले | 5000 |
| मा. श्री. गौरव महाले | 8500 |
| गुरुकृपा क्लासेस जळगाव | 1500 |
| दीपस्तंभ धुळे, पीएसआय बॅच | 1120 |
| मा. श्री. पद्माकर डी. | 4000 |
| महालक्ष्मी स्वीट्स | 18786 |
| मा. श्री. शरद विठ्ठल महाजन | 5000 |
| ॲड. नारायण लाठी | 50000 |
| मा. श्री. हिरालाल रमन पटेल | 5000 |
| मा. डॉ. अनंत प्रकाश पवार | 2500 |
| मा. श्री. दत्तात्रय शंकर चौधरी | 11001 |
| मा. श्री. सुधाकर महारु पाटील | 1001 |
| मा. श्रीमती प्रतिमा दिलीप पाटील | 8000 |
| मा. श्रीमती डिम्पल सुरेश रेणुके | 50 |
| मा. श्री. सुरेश विधु चौधरी | 500 |
| मा. श्रीमती विजया प्रभाकर भाटे | 2500 |
| मा. श्री. प्रितेश कोळते | 500 |
| मा. श्रीमती सुलभा करमरकर | 1000 |
| मा. श्रीमती कविता राजेश झाल्टे | 15000 |
| मा. श्री. सुनिल जगन्नाथ येवले | 2500 |
| मा. श्री. के. आर. पाटील | 2000 |
| मा. श्री. तुकाराम हरी आंबे | 2000 |
| मा. श्री. नरेंद्र पाटील | 11000 |
| मा. श्री. मुरलीधर पिंपळे | 1000 |
| मा. श्री. अभय प्रकाश गांधी | 5000 |
| मा. श्री. राजेंद्र एस. मुळे | 1000 |
| श्री दत्त मेडीकल | 10000 |
| मा. श्री. अनुज सुहास लढ्ढे | 20000 |
| मा. श्री. कमलाकर देसले | 5000 |
| मा. श्री. गोकुळ महाजन | 10000 |

## मनोबल केंद्रास भेट देणारे मान्यवर

मा. डॉ. उज्ज्वला नितीन राठी (एरंडोल)
मा. सौ. जयश्री पाटील, (एरंडोल)
मा. किशोर काशिनाथ पाटील (जळगाव)
मा. रविंद्रसिंह परदेशी (पोलीस अधिक्षक, नवी मुंबई)
मा. ॲड. राजेश व सौ. कविता झाल्टे (जळगाव)
मा. डॉ. पराग व डॉ. चारुता गायकी,
अनिता/अनुजा गायकी (मुंबई)
मा. श्री. वि. दा. पिंगळे (पुणे)
मा. श्री. अरुण जाधव (मुंबई)
मा. श्री. दिपक जगन्नाथ पाटील (नाशिक)
मा. श्री. कैलास रामराव पाटील
मा. श्री. सुनिल पुरुषोत्तम जोशी
मा. श्री. अनिल शंकर चौधरी
मा. श्री. सी. पी. उपासनी (नाशिक)
मा. श्री. नरेंद्र महाजन
मा. श्री. विजय पाटील
मा. डॉ. कल्पना भोळे (नागपूर)
मा. श्रीमती. ज्योत्स्ना चौधरी (डोंबिवली)
मा. डॉ. पंडीत विद्यासागर (मा. कुलगुरु)
मा. डॉ. संगीता लाहड (बुलढाणा)
मा. डॉ. प्रतिम जायभाये (बुलढाणा)
मा. डॉ. दीपक लढ्ढा
मा. श्री. मुकुंद धुत
प्रा. डॉ. व्ही. एल. धारुरकर (औरंगाबाद)
मा. त्र्यंबक कापडे (निवासी संपादक, दैनिक लोकमत)
मा. सुशिल गुर्जर (जळगाव)
मा. डॉ. सुश्मिता अडकुळ, डॉ. वृषाली अडकुळ,
मा. श्री. शरद पाटील
मा. श्री. संजय वाणी
मा. श्री. राजेंद्र पाटील
मा. श्री. मुकुंद गोसावी, (जळगाव)
मा. श्री. अमोल जोशी
मा. श्री. कार्तीक टॉवरे
मा. श्रीमती प्रियंका टॉवरे
मा. श्रीमती माधुरी महाजन
मा. श्रीमती सुरती पाटील
मा. श्री. राजेश हळदणकर (आयआरएस)
मा. श्रीमती. पायल सेन (मुंबई)
मा. श्री. उज्ज्वल निरगुडकर
मा. यासुको निशिहारा (जपान)
मा. श्री. गोकुळ महाजन, ठाणे
मा. श्री. चंद्रकांत दादा पाटील, (सहकार मंत्री)
मा. श्री. संतोष गर्जे, प्रिती गर्जे (बालग्राम गेवराई) बीड.
मा. श्री. अरुण गुजर, पुणे.
मा. सौ. प्रतिमा पाटील, पुणे.
मा. डॉ. एस. डी. निकाळे

**Deepstambh Foundation**
Web : www.deepstambh.org
Email : deepstambh27@gmail.com
Facebook : yajurvendrafanpage